## :- विक्री फॉर्म नमूना -:

विषय :- आरोग्य विभागातंर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिनस्त असलेल्या विभागातील अंतिम निर्लेखित उपकरणे व जडवस्तु यांचे विक्री करणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाची उपकरणे, व जडवस्तू याची विक्री दरपत्रक सुचना arogya.maharashtra.gov.in व www.nhm.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रकाशित दि.१३/११/२०२५.

या कार्यालयातील निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांची विक्री पुढील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१) विक्री करावयाची उपकरणे व जडवस्तू आपणास आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे दि.१३/११/२०२५ ते २४/११/२०२५ पर्यत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

२) विक्री करावयाच्या रुगणालयीन उपकरणे व जडवस्तूंची यादी आपणास आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर येथे दि.१३/११/२०२५ ते २४/११/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

३) वस्तू जशा स्थितीत आहेत त्या स्थितीत विकणे आहे.

४) ठेकेदारास आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर येथून निवीदा फॉर्म प्राप्त करावा लागेल आणि त्या अधिकृत फॉर्मवरच निर्लेखित वस्तू विक्री बाबतचा लखोटा असे नमुद करुन सिलबंद लखोटा जाहीरातीतील नमुद अंतिम तारखे पुर्वी दि.२४/११/ /२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत या कार्यालयात सादर करावा लागेल.

५) वेळेनंतर अथवा उशिरा आलेले लखोटे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) सदरील लॉट नं.१ व २ हे एकाच ठेकेदारास घेणे बंधनकारक असेल.

७) अधिकृत फॉर्म सादर न केल्यास आपले दरपत्रक रद्द करण्यात यईल.

८) संपुर्ण लॉटची किंमत आपणास नमूद करावी लागेल. सदर किमंतीवर आपणास १८ टक्के दराने जी.एस.टी.भरावा लागेल.

९) फॉर्म सोबत पॅन कार्ड, जि.एस.टी.नोंदणी पत्र, बॅक डिटेल, शॉप ॲक्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. सदर कागदपत्रे आपल्या अर्जासोबत जोडली नसतील तर आपला अर्ज रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१०) आपले दरपत्रक मान्य झाल्यास आणि कार्यालयाचे आदेश आपणास प्राप्त झालेस त्याच दिवशी एकुण १०० टक्के एवढी रक्कम आपणास जमा करावी लागेल आणि जी.एस.टी.१८ टक्के असे एकूण रक्कम धनाकर्षाच्या (डिमांड ड्राफट) च्या स्वरुपात या कार्यालयामध्ये पुढील ५ दिवसामध्ये जमा करावीर लागेल. अन्यथा आपला कोणताही अधिकार या लॉटवर राहणार नाही.

११) रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू आपणास आहे त्या जागेवरुन कार्यालयास बाब विचारात घेवून स्वखर्चाने घेऊन जावी लागतील.

## :- अटी व शर्ती -:

१) दरपत्रक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात दि.१३/११/२०२५ ते २४/११/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेच्या आत सादर करावेत.

२) सदरील दरपत्रक मोहरबंद लिफाफयामध्ये सादर करण्यात यावेत. सदरील लिफाफयावर निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह खरेदीकरीता दरपत्रके असे ठळकपणे नमूद करण्यात यावे.

३) विहीत मुदतीत प्राप्त झालेलीच दरपत्रके स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) सदरील नमूद दरामध्ये खाडाखोड अथवा अंक गिरवले असता सदर दरपत्रक बाद करण्यात येईल.

५) सदरील दरपत्रक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात दि.२८/११/२०२५ रोजी उघडण्यात येईल.

६) खरेदीधारकास शासकीय कामाचा अनूभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

७) सदर सर्व लॉटची खरेदीदाराकडून लावण्यात येणा-या किंमतीची एकूण येणारी रक्कम ज्या खरीदाराची जास्त असेल त्याप्रमाणे अनुक्रम लावले जातील.

८) सदर निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जहवस्तू संग्रह ७ दिवसाच्या आत उचल करणे बंधनकारक राहील व उचल करण्याची जबाबदारी खरेदीधारकाची राहील. याकरिता कुठलाही वाहतूक भत्ता, कुरीयर, किंवा इतर भाडे या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) दरपत्रकरंना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये त्रुटी आढळल्यास ही दरपत्रके स्विकारणे, नाकारणे, अथवा रद्द करणे, इत्यादी अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको, छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.

13/11/2025

(डॉ.संतोष च.कडले)
प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,
छत्रपती संभाजीनगर.

दिनांकः-१३/११/२०२५.

**निर्लेखन प्रस्तावीत रुग्णालयीन, शितसाखळी उपकरणे व जडसाहीत्य संग्रह साहीत्य विल्हेवाट संबधीचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर येथील एकुण ५०८ उपकरणे, साहीत्य निर्लेखन प्रस्तावीत केलेली आहेत.

या सर्व उपकरणांबाबत/साहीत्याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) या सर्व उपकरणांवर मा.महालेखाकार यांनी कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप घेतलेले नाहीत.

२) या सर्व उपकरणांवर अंतर्गत लेखा परिक्षणात भांडार पडताळणी किंवा अकाऊंटन्ट जनरल मुंबई /नागपूर यांनी त्यांचे परिक्षणात कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप घेतलेले नाहीत.

३) या सर्व उपकरणांवर कोणत्याही स्वरुपाचा कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नाही.

४) या सर्व उपकरणांवर कोणत्याही न्यायालयात कसल्याही स्वरुपाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

५) या सर्व उपकरणांवर संबधीत कंपनीच्या उत्पादकाचा/त्यांच्या अधिकृत विक्रेत्यांच्या दावा संस्था-प्रमुखाकडे प्रलंबीत अथवा न्यायप्रविष्ठ नाहीत.

६) या सर्व उपकरणांबाबत कोणीही माहितीच्या अधिकारात माहिती मागीतलेली नाही.

७) या सर्व उपकरणांवर पुरवठादाराकडे चुकीचा, सदोष पुरवठा इ. मुळे कोणत्याही प्रकारचा क्लेम प्रलंबीत नाही तसेच कार्यालयाकडेही पुरवठादाराचा कोणत्याही प्रकारचा क्लेम प्रलंबित नाही.

या सर्व उपकरणांविषयी भविष्यात एखादे प्रकरण उद्‌भवल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही आमची राहील.

13/11/2025

**(डॉ.संतोष च.कडले)**
**प्राचार्य,**
**आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**दिनांकः-१३/११/२०२५.**

# दरपत्रक सुचना

आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य व कुटूंबकल्याण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिनस्त असलेल्या प्रस्तुत कार्यालयातील निर्लेखित केलेली उपकरणे,शीतसाखळी उपकरणे, व जडवस्तु संग्रह यांची विक्री करिता ईच्छुक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडुन सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| SR.NO. | Activity | Date/Period |
|---|---|---|
| 1 | Sale of Quotation (Rs.240) | 13/11/2025 |
| 2 | Date Of submitting Quotation | 13/11/2025 |
| 3 | Last Date Of Submitting Quotation | 24/11/2025 |
| 4 | Quotation Opening | 28/11/2025 |

आरोग्य विभागांतर्गत प्राचार्य, आरोग्य व कुटूंबकल्याण प्रशिक्षण केंद्र एन ५ सिडको ,छत्रपती संभाजीनगर येथील विक्री करावयाच्या निर्लेखित केलेली उपकरणे, व जडवस्तु संग्रह यांचा तपशील ईच्छुक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांनी आपले प्रतिष्ठानचे दरपत्रके पात्रतेसाठी खालिलप्रमाणे प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

१) Shop Act शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशनची प्रत (गुमास्ता नोंदणी पत्र)
२) Pan Card (पॅन कार्डची प्रत)
३) GST Registration Certificate (जीएसटी रजिस्ट्रेशन नोंदणी प्रत)
४)Quotation on firm Letterhead (प्रतिष्ठाणाचे लेटर हेडवर दरपत्रक)

13/11/2025

(डॉ.संतोष कडले)
प्राचार्य
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर

## आरोग्य विभाग

## आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको एन-५, छत्रपती संभाजीनगर

आरोग्य विभागांतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,एन-५ सिडको,छत्रपती संभाजीनगर येथील निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. इच्छुक ठेकेदारांनी विक्री फॉर्म नमुना प्राप्त करणेसाठी या कार्यालयाशी दिनांक:-१३/११/२०२५ ते २४/११/२०२५ या कालावधी मध्ये सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत संपर्क साधावा.

विक्री फॉर्म कोटेशनसह जमा करण्याचा अंतिम दिनांक:-२४/११/२०२५.

दुरध्वनी क्रं. :-०२४०, २४८५३४५
ई-मेल :- hfwtcabd@rediffmail.com / hfwtcabd@gmail.com

13/11/2025

(डॉ.संतोष च.कडले)
प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,
छत्रपती संभाजीनगर.